# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : १६३०८ /ग-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ३ ऑगस्ट, २०२२

## :: परिपत्रक ::

**संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १०९१२/ग-१, दिनांक २६ मे, २०२२.**

या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांना क्यूआर कोड आधारित नविन कार्यालयीन ओळखपत्र देण्यात येणार असल्याने विहित नमुन्यामध्ये स्वत:ची माहिती भरून ग-१ कक्षाकडे सादर करण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात आले आहे.

तथापि काही अधिकारी / कर्मचारी यांनी संदर्भाधीन परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यानुसार स्वत:ची माहिती अद्याप ग-१ कक्षाकडे सादर केली नसल्याची तसेच काही अधिकारी / कर्मचारी यांनी अपूर्ण माहिती भरून नमुना सादर केल्याची बाब निदर्शनास आली आहे.

तरी ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी अद्याप स्वत:ची माहिती संदर्भाधीन परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये भरुन ग-१ कक्षाकडे सादर केलेली नाही त्यांनी तसेच ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी संदर्भाधीन परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यातील माहिती अपूर्ण भरलेली आहे त्यांनी त्यांची संपूर्ण व परिपूर्ण माहिती विहीत नमुन्यानुसार भरून ग-१ कक्षाकडे दिनांक १९ /०८/ २०२२ रोजी पर्यंत सादर करावी.

ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून उक्त नमूद नमुन्यानुसार संपूर्ण व परिपूर्ण माहिती ग-१ कक्षाकडे सादर करण्यात येणार नाही, अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांना कार्यालयाकडून नवीन ओळखपत्र उपलब्ध करुन देण्यात येणार नाही कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(रविंद्र जगदाळे)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति :-**

**(१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.**

**(२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.**

**(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.**

.. २/-

(४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.

(५) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.

(६) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(७) या सचिवालयातील सर्व अधिकारी.

(८) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(९) समादेशक अधिकारी, अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१०) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व कक्ष व कर्मचारी.